# नायक्स टयुटोरिअल्स

Way to Excellence

सराव प्रश्नपत्रिका क्र – २ | गुण ः- ८०

इयत्ता ः- १० वी | मराठी अक्षरभारती | वेळ ः- ३ तास

कृतिपत्रिकेसाठी सूचना :
(१) सूचने नुसार कृती व व्याकरण कृती यामधील आकृत्या काढाव्यात .
(२) आकृत्या पेनानेच काढाव्यात .
(३) उपयोजित लेखनातील कृतींसाठी (सूचना,निवेदन इ . ) आकृतीची आवश्यकता नाही . तसेच या कृती उत्तरपत्रिकेत पुन्हा लिहून काढू नयेत .
(४) स्वच्छता, नीटनेटकेपणा व लेखननियमांनुसार लेखन यांकडे जाणीवपूर्वक लक्ष दयावे .

## विभाग १ः पठित गदय

प्रश्न .१) अ) उताऱ्याच्या आधारे सूचने नूसार कृती करा .

(१) अ) या उताऱ्यातील आलेल्या दोन साहित्यिकांची नावे लिहा . १

[ ] [ ]

ब) योग्य पर्याय निवडा . १

लेखक वाईला गेले . कारण . . . . . . . .

(क) साहित्य संमेलनाचे अध्यक्ष म्हणून (ग) पु . ल . यांच्या घरी

(ख) नातेवाईकांना भेटण्यासाठी (घ) विश्वकोशाचे अध्यक्ष म्हणून

एकदा मी पु.ल. देशपांडे यांच्याकडे काही एक निमित्ताने गेलो होतो. काम झाल्यावर मी निघण्याच्या बेतात होतो; तेवढ्यात सुनीताबाईंनी मला थांबवले व विचारले, ''तुम्हांला शाल दिली तर चालेल काय ?''

मी एका पायावर 'हो' म्हटले. पु.ल. व सुनीताबाई यांनी मला शाल दयावी, हा मला मोठा गौरव वाटला. ती शाल मी माझ्या खोलीतल्या सुटकेसमध्ये ठेवून दिली. वापरली मात्र कधीच नाही.

पुढे वाईला विश्वकोशाचा अध्यक्ष म्हणून मी गेलो. तिथे नदीकाठच्या प्राज्ञ पाठशाळेच्या खोलीत मी राहत असे. खोलीच्या दक्षिणेकडील खिडक्या कृष्णा नदीच्या चिंचोळ्या प्रवाहावर होत्या. थंडीच्या दिवसात एक बाई माझ्या खिडकीखालील घाटाच्या छोट्या तटावर तिचे छोटे मूल एका टोपलीत ठेवून मासे पकडण्याच्या उदयोगात होती. तिचे बाळ कडाक्याच्या थंडीने कुडकुडत रडत होते; पण आई तिकडे बघतही नव्हती. मला मात्र राहवले नाही. मी सुटकेसमधील 'पुलकित' शाल काढली, पाचपन्नास रुपयांच्या नोटा काढल्या व त्या बाईला हाक मारली. खिडकीतून ते सर्व खाली दिले आणि म्हटले, ''त्या बाळाला आधी शालीत गुंडाळ आणि मग मासे मारत बैस.'' या घटनेची ऊब पुलकित शालीच्या उबेपेक्षा अधिक होती.

कविवर्य नारायण सुर्वे खूप सभा, संमेलने गाजवत. पुढे ते साहित्य संमेलनाचे अध्यक्षही झाले. परिणामतः त्यांच्या कार्यक्रमांना अहोरात्र भरतीच असे. प्रत्येक कार्यक्रमात सन्मानाची शाल व श्रीफळ त्यांना मिळत राही. एकदा ते मला म्हणाले, ''या शाली घेऊन घेऊन मी आता 'शालीन' बनू लागलो आहे.''

(२) विधान पूर्ण करा . २

लेखकांनी पुलकित शाल . . . . . . . दिली .

(३) समाजातील वंचित,गरीब लोकांविषयीच्या तुमच्या भावना लिहा . ३

आ) खालील उताऱ्याच्या आधारे सूचनेनुसार कृती करा .

(१) आकृतिबंध पूर्ण करा . २

अ) [ ] — [ भिक्षेकऱ्याने लेखकाला दिलेल्या विशेषणे ] — [ ]

आ) [ ] — पुलावर पाहिलेल्या भिक्षेकऱ्याची अवस्था — [ ]

याच सुमारास मी शनिवार पेठेतील ओंकारेश्वर मंदिराला बहुधा रोज संध्याकाळी जात असे. तेथील कट्ट्यावर बसणे मला आवडे. एक दिवस काय घडले, की कडक थंडीच्या दिवसात एक म्हातारा, अशक्त भिक्षेकरी कट्ट्याला लागूनच चिरगुटे टाकून व पांघरून कुडकुडत बसल्याचे मी पाहिले.

दुसऱ्या दिवशी मी दोन शाली घेऊन ओंकारेश्वराच्या कट्ट्यावर आलो. तो म्हातारा होताच. त्याला दोन्ही शाली दिल्या. त्याने थरथरत्या हातांनी मला नमस्कार केला.

पुढे चार पाच दिवस मला काही कामांमुळे संध्याकाळी ओंकारेश्वराला जाण्यास उसंत लाभली नाही. त्यानंतर मी नेहमीप्रमाणे ये-जा करीत राहिलो. मग एकदम त्या भिक्षेकरी वृद्धाची आठवण आली. तो नेहमीच्या ठिकाणी नव्हताच. तेथील पुलावर चक्कर मारावी म्हणून मी उठलो व पुलावरून चालू लागलो.

पुलाच्या जवळपास मध्यावर तो भिक्षेकरी म्हातारा दिसला. मी लगबगीने त्याच्याकडे गेलो. पाहतो तो काय, तिच चिरगुटे आणि अंगाखाली व अंगावर, तेच कुडकुडणे, तेच दीनवाणे जिणे!

मी म्हटले, "बाबा, तुम्ही मला ओळखले?"

त्याने नकारार्थी मान हलवली.

मग मीच म्हटले, "बाबा, पाच-सहा दिवसांपूर्वी मी तुम्हाला दोन शाली दिल्या होत्या. आठवते?"

यावर म्हातारा खुलला व पुन्हा हात जोडून म्हणाला, "हे भल्या माणसा, तू लई मोठा ! म्यास्नी शाली दिल्या ! पण बाबा, म्या भिकाऱ्याला शाली कशा शोभतील? त्या शोभेपेक्षा पोटाची आग लई वाईट ! मी शाली इकल्या व दोन-तीन दिवस पोटभर जेवून घेतलं बाबा ! आमचं हे असलं बिकट जिणं ! तुझं लई उपकार हायेत बाबा."

शालीची शोभा आणि ऊब व पोटाची आग आणि अन्नाची ऊब!

भुकेल्यास अन्न द्यावे, तहानेल्यास पाणी द्यावे आणि हेही जमले नाही, तर अभाग्यांना सन्मानाच्या शाली तरी द्याव्यात !

(२) अ) आकृती पूर्ण करा . १

[ ] — लेखकाने देण्याबाबत व्यक्त केलेले विचार — [ ]

आ) कारणे लिह .१

१) लेखक चारपाच दिवस मंदिरात गेले नाहीत कारण

(३) समाजातील अगतिक व गरजू व्यक्तीला तुम्ही केलेली मदत लिहा . ३

## अपठित गदय

इ) खालील उताऱ्याच्या आधारे सूचनेनुसार कृती करा .

(१) खालील आकृती पूर्ण करा . २

स्वप्नांबाबतच्या महत्त्वाच्या बाबी

[ ] [ ] [ ] [ ]

**माणसाला स्वप्नं बघता आली पाहिजेत. नुसतीच बघता आली पाहिजेत, असं नाही, तर ती पूर्ण कशी होतील याचा विचार करता आला पाहिजे. स्वप्नांविषयी लोक काय काय बोलतात! कुणी कुणी तर स्वप्नांना भलतचं तुच्छ लेखतात. 'भलती–सलती स्वप्नं पाहू नकोस', असा सल्लाही देतात. माझं तर असं म्हणणं आहे, ज्याला स्वप्न बघता येत नाही तो माणूसच नाही! जे स्वप्न आपल्याला समृद्ध करतं. ते बघण्यासाठी संवेदनशील मन असावं लागतं. ज्याच्याकडे असं तीव्र संवेदनशील मन असतं, ती माणसं आपल्या स्वप्नपूर्तीसाठी वाट्टेल ते करतात. इतरांपासून आपल्याला वेगळं करतात. स्वत: काहीतरी आदर्श बनून ते वावरतात, नाहीतर इतरांना आदर्श बनवतात; पण अशा संवेदनशीलतेचा अभाव असणारी माणसं अधांतरीच तरंगत राहतात. ना धड इकडे, ना धड तिकडे अशीच त्यांची अवस्था असते. लोक तिलाच स्वप्नाळू वृत्ती म्हणत असावेत! बिना ध्यास, नि बिना धडपडीशिवाय असलेली ही स्वप्नाळू वृत्ती तशी घातकच नाही का ?**

(२) दिलेल्या पर्यायांतून योग्य पर्यायाची निवड करून वाक्य पून्हा लिहा . २

१) स्वप्नांना काही लोक . . . . . . . लेखतात .
(आदर्श, तुच्छ , घातक , प्रेरक)
२) स्वप्न बघण्यासाठी . . . . . . . . मनाची आवश्यकता आहे .
(विचारी ,व्यवहारी ,संवेदनशील, काटकसरी)
३) स्वप्नपूर्तीसाठी बऱ्याचदा इतरांना . . . . . . . . बनवले जाते .
(आदर्श , महान , लहान, भगवान)
४) स्वप्नाळूवृत्तीत . . . . . . . महत्वाची आहे .
(बडबड, धडपड,उतावीळवृत्ती, गोंधळीवृत्ती)

विभाग २ – पदय

प्रश्न .२)अ) कवितेच्या आधारे दिलेल्या सूचनेनुसार कृती करा .
१) विधान पूर्ण करा . २
(१) कवीचे आयुष्य . . . . . . शेकले .
(२) कवीची जिंदगी . . . . . . . बरबाद झाली .

दोन दिवस वाट पाहण्यात गेले; दोन दुःखात गेले.
हिशोब करतो आहे किती राहिलेत डोईवर उन्हाळे
शेकडो वेळा चंद्र आला; तारे फुलले, रात्र धुंद झाली;
भाकरीचा चंद्र शोधण्यातच जिंदगी बरबाद झाली.

हे हात माझे सर्वस्व; दारिद्र्याकडे गहाणच राहिले
कधी माना उंचावलेले, कधी कलम झालेले पाहिले
हरघडी अश्रू वाळविले नाहीत; पण असेही क्षण आले
तेव्हा अश्रूच मित्र होऊन साहाय्यास धावून आले.

दुनियेचा विचार हरघडी केला, अगा जगमय झालो
दुःख पेलावे कसे, पुन्हा जगावे कसे, याच शाळेत शिकलो
झोतभट्टीत शेकावे पोलाद तसे आयुष्य छान शेकले
दोन दिवस वाट पाहण्यात गेले; दोन दुःखात गेले.

२) एका शब्दांत उत्तर लिहा . २
(१) कवीचे सर्वस्व असलेली गोष्ट – [ ]
(२) कवीचा जवळचा मित्र –[ ]

(३) शब्दांचे अर्थ लिहा . २
१) डोई २) रात्र ३) पोलाद ४) आयुष्य
(४) 'दोन दिवस वाट पाहण्यात गेले दोन दुखात गेले' विचार सौंदर्य स्पष्ट करा . २

आ) खालील पैकी कोणत्याही एका कवितेवर दिलेल्या मुददयांच्या आधारे कृती करा . ८
कविता : स्वप्न करू साकार/योगी सर्वकाळ सुखदाता
(१) कवितेच्या कवी/कवयित्रीचे नाव लिहा . १
(२) कवितेचा विषय तुमच्या शब्दात लिहा . १

(३) कवितेतून मिळणारा संदेश. २

(४) कविता आवडण्याची वा न आवडण्याची कारणे २

(५) शब्दांचे अर्थ लिहा. २

१) चक्र २) तेज ३) हस्त ४) अधिकार

किंवा

१) उदक २) तृषा ३) रसना ४) मेघ


## विभाग ३ : स्थुलवाचन

प्रश्न.३) खालील पैकी कोणत्याही दोन कृती सोडवा. ६

(१) 'स्काय इज द लिमिट' ही परिस्थीती केव्हा निर्माण होऊ शकते हे तुम्ही अभ्यासलेल्या पाठाच्या आधारे लिहा.

(२) 'पाणी हेच जीवन' या विधानासंबंधी तुमचे विचार लिहा.

(३) खालील मुद्दयांवर एक परिच्छेद तयार करा. (७ ते८वाक्यांत)




## विभाग ४ – भाषाभ्यास

प्रश्न.४) अ) व्याकरण घटकांवर आधारित कृती . २

(१) वाक्यांचे प्रकार ओळखा.

१) देवाला नमस्कार करा

२) अरेरे! फार वाईट झाले.

(२) कंसातील सूचनेनुसार वाक्यरूपांतार कारा. २

१) आपल्याला येत नसताना दुसऱ्याना काम सांगणे योग्य नाही (होकारार्थी वाक्य करा)

२) जगी सर्वसुखी असा कोण आहे? (विधानार्थी वाक्य करा)

(३) वाक्य प्रचाराचा अर्थसांगून वाक्यात उपयोग करा. (फक्त २) ४

क) पारंगत असणे ख) कीव येणे घ) झुंबड उडणे


आ) भाषासौंदर्य :

१)(१) खालील शब्दसमूहा बद्दल एक शब्द लिहा. १

(अ) ईश्वर आहे असे मानणारा –

(आ) किल्ल्याच्या सभोवतालची भिंत –

(२) खालील शब्दाचे दोन अर्थ लिहा. १




(३) खालील शब्दांसाठी योग्य विरूद्धार्थी शब्द लिहा. १

(अ) विजय ×  (आ) आनंद ×

(४) वचन बदला. १

(अ) घर –  (आ) डोंगर –

२) लेखननियमांनुसार खालील वाक्ये लिहा. २

अचुक शब्द ओळखा.

(१) सांस्कृतीक/सांस्कृतिक/सास्कृतीक/संस्कृतिक

(२) कनिष्ठ/कनिष्ट/कनीष्ठ/कनीष्ट

३) खालील वाक्यांत योग्य त्या विरामचिन्हांचा वापर करून वाक्ये पून्हा लिहा. २

(१) त्यांनीच मला डाएटचा सल्ला दिला

(२) रामानं सेतूबंधन केलं पण त्यासाठी अनेकांचा हातभार लागला

## विभाग ५ – उपयोजित लेखन

प्रश्न.५)अ) (१) खालील निवेदन वाचा व दिलेल्या कृतीपैकी एक कृती सोडवा. ६

**आयडियल बुक डेपो**

दादर, मुंबई

**सर्व प्रकारची पुस्तके मिळण्याचे खात्रीचे ठिकाण**

गुणवंत विद्यार्थ्यांसाठी
शाळा, महाविद्यालयासाठी

आकर्षक सवलत
विशेष सूट

**गुणवंत विद्यार्थ्यांनी गुणपत्रिका सोबत आणावी.**

↓

ग्रंथालय प्रतिनिधी या नात्याने

- शालेय ग्रंथालयासाठी पुस्तकांची मागणी करणारे पत्र लिहा.
- शालेय ग्रंथालयासाठी आलेल्या पुस्तकांपैकी काही पुस्तके फाटलेली आल्याबद्दची तक्रार करणारे पत्र लिहा.

किंवा

(२) विभाग १ गदय कृती मधील 'इ' अपठित गदय उताऱ्याचे एक तृतीयांश शब्द मर्यादेत सारांश लेखन खरा.

आ) खालील कोणत्याही दोन कृती सोडवा. १०

१) खालील विषयावर जाहिरात तयार करा. ५

सुटटीतील छंदवर्ग

२) खालील विषयावर बातमी तयार करा. ५

शाळेत वसुंधरा दिनानिमित्त वृक्षदिंडी व वृक्षारोपण कार्यक्रम वनाधिकारी साहेब मा. शशिकांत राव यांच्या उपस्थितीत संपन्न

३) खालील शब्दांचा योग्य वापर करून कथा तयार करा. ५

मैत्री → दप्तर → गृहपाठ → रस्ता →

इ) खालील पैकी एका विषयावर लेखन करा. (१०० ते १२० शब्द) ८

१) तुमच्या शाळेत साजरा झालेल्या 'प्रजासत्ताक दिन' प्रसंगाचे लेखन करा.

२) आकृतीनुसार लेखन करा.




३) वैचारिक

निसर्ग माझा सोबती

मुद्दे : निसर्गाचे घटक – माणूस व निसर्ग – निसर्गाचे महत्व – संवर्धन – भविष्य

****__________****